# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/३९/ of 2022**

## परिपत्रक:

**विषय:— हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयांत ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भ:— शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १०७/ विशि—५ दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. आपली युवाशक्ती विशाल अदभुत व ऊर्जावान असून देशाला दिशा देण्याचे कार्य करू शकते. आजची युवाशक्ती आपल्या मायभूमीचे भविष्य असून प्रत्येक सामाजिक संस्था व्यक्तिसमूह या नात्याने आपल्याला युवकांची ऊर्जा सकारात्मक दिशेने प्रवाहित झाली पाहिजे. म्हणून प्रत्येक युवक कटिबध्द असला पाहिजे. युवकांच्या भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. हीच ती वेळ जेव्हा आपण त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक शारिरीक व बौध्दिक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करू शकतो.

"हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड" संस्था ही युवा व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून संपूर्ण देशात स्काऊटिंग ॲन्ड गाईडसचे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड या संस्थेचे रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय—

हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम, उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात ऐच्छिक स्वरूपात विना आर्थिक सहाय्य तत्वावर राबविण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती—

१. उच्च शिक्षण संचालनालय अधिनस्त शासकीय/ अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित स्वयंअर्थसहाय्यित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे यांना हा उपक्रम ऐच्छिक राहील.

२. सदर उपक्रमास शासनावर कोणताही आर्थिक व प्रशासकीय भार येणार नाही (विना आर्थिक सहाय्य तत्वावर) या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

३. महाविद्यालयामधील शैक्षणिक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत/कालावधीत सदर उपक्रम राबविण्यात यावा

४. सदर उपक्रमाचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सहामाहीस सादर करण्यात यावा.

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शैक्षणिक संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे व याबाबत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक यांनी वरील दिलेल्या सुचनांचे पालन करावे

सही/—
(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
२५ जानेवारी, २०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

************

हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयांत ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२१/प्र.क्र.१०७ /विशि-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १८ नोव्हेंबर , २०२१

**संदर्भ** : - संचालक, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे यांची दिनांक २२/१०/२०२१ तसेच दिनांक ११/११/२०२१ रोजीची पत्रे

**प्रस्तावना:**

भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. आपली युवाशक्ती विशाल अदभुत व ऊर्जावान असून देशाला दिशा देण्याचे कार्य करु शकते. आजची युवाशक्ती आपल्या मायभूमीचे भविष्य असून प्रत्येक सामाजिक संस्था व्यक्तिसमूह या नात्याने आपल्याला युवकांची ऊर्जा सकारात्मक दिशेने प्रवाहित झाली पाहिजे. म्हणून प्रत्येक युवक कटिबध्द असला पाहिजे. युवकांच्या भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. हीच ती वेळ जेव्हा आपण त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक शारिरीक व बौध्दिक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करु शकतो.

"हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड" संस्था ही युवा व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून संपूर्ण देशात स्काऊटिंग व गाईडसचे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड या संस्थेचे रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम, उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात विना आर्थिक सहाय्य तत्वावर राबविण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती** -

१. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय / अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित स्वयंअर्थसहाय्यित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे यांना हा उपक्रम ऐच्छिक राहील.

२. सदर उपक्रमास शासनावर कोणताही आर्थिक व प्रशासकीय भार येणार नाही ( विना आर्थिक सहाय्य तत्वावर ) या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

३. महाविद्यालयामधील शैक्षणिक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत / कालावधीत सदर उपक्रम राबविण्यात यावा.

४. सदर उपक्रमाचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना दर सहामाहीस सादर करण्यात यावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२११११८१६१४४३११०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], serialNumber=[illegible], cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2021.11.18 16:36:27 +05'30'

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हिल मुंबई
२.मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३.मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४.मा. राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे
७. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण
८.सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे
९. स्वीय सहाय्यक सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अध्यक्ष / सचिव, हिंदुस्थान स्काऊटस ॲण्ड गाईडस्, शास्त्री वार्ड, पंचायत समिती कॉलनी, गोंदिया , महाराष्ट्र राज्य -४४१ ६०१.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,
उच्च शिक्षण,मुंबई विभाग, मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१
www.jdhemumbai.gov.in E-mail- jdhemumbai@gmail.com Tel & Fax No. ०२२ २२६५६६००

क्र.-सहसं/उंशि/मुंवि/२०२१/ १५८६ दिनांक- १०.१२.२०२१

प्रति,
प्राचार्य,अशासकीय अनुदानित,विना अनुदानित,
कायम विना अनुदानित,आदर्श महाविद्यालये,
मुंबई शहर,मुंबई उपनगर,मुंबई.

विषय :-"हिंदूस्थान स्काऊट ॲण्ड गाईड "संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविणेबाबत.

संदर्भ :- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०२१/प्र.क्र.१०७/विशि-५ दि. १८.११.२०२१.
२. उच्च शिक्षण संचालनालयाची समक्रमांकित पत्रे दि. २२/१०/२०२१ व ११/११/२०२१
३. उच्च शिक्षण संचालनालयाचे प्र.क्र.स्काऊट गाईड/१४२१/प्र.क्र.०५/मवि-१/२०२१/१३७८० दि. २६.११.२०२१.

उपरोक्त संदर्भान्वये राज्य शासनाने "हिंदूस्थान स्कांऊट ॲण्ड गाईड "संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर उपक्रम खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून महाविद्यालय स्तरावर राबविण्यात यावेत.

१. सदर उपक्रम हे ऐच्छिक स्वरुपात रहातील.
२. सदर उपक्रमांतर्गत शासनावर कोणताही आर्थीक व प्रशासकीय भार येणार नाही.
३. महाविद्यालयातील शैक्षणीक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत सदर उपक्रम राबविण्यात यावेत.

या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता "हिंदूस्थान स्काऊट ॲण्ड गाईड " ही संस्था युवा व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आली आहे. सदर संस्थेस सर्व महाविद्यालयांनी वर नमूद केलेले उपक्रम राबविण्याकरीता सहकार्य करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर ६ महिन्यांतून एकदा या कार्यालयास अवगत करण्यात यावा.

आपली विश्वासु,

डॉ. सोनाली रोडे
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

प्रत
१. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. राज्य सचिव, "हिंदूस्थान स्काऊट ॲण्ड गाईड ", शास्त्री वार्ड, पंचायत समिती कॉलनी, गोंदीया- ४४१ ६०१ यांना माहितीस्तव अग्रेषीत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३१ फॅक्स नं.०२०/२६१२११५३

क्र.:स्काऊट-गाईड/१४२१/प्र.क्र.०५/मवि-४/२०२१/73680 दिनांक- /११/२०२१

26 NOV 2021

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

विषय: हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेला महाराष्ट्र राज्यात विना आर्थिक सहाय्य वरिष्ठ महाविद्यालयात रेंजर आणि रोवर युनिट चे उपक्रम राबविण्याची परवानगी मिळण्याबाबत..

संदर्भ:१. शासन निर्णय क्र.: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१०७/विशि-५ दि. १८.११.२०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील, महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविण्याबाबत संदर्भांकित शासन निर्णय निर्गत झालेला आहे. या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. केलेली कार्यवाही संचालनालयास अवगत करण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत: राज्य सचिव, हिंदुस्तान स्काउट्स ॲण्ड गाईडस् - शास्त्री वार्ड, पंचायत समिती कॉलनी, गोंदीया- ४४१६०१ यांना माहितीस्तव अग्रेषित.